दाखल दिनांक – ०९/०५/२०२२
नोंदणी दिनांक – ०९/०५/२०२२
निकाल दिनांक – ०९/०६/२०२६
कालावधी – वर्षे महिने दिवस
०४ ०१ ००

**न्यायदंडाधिकारी वर्ग–१ सावंतवाडी, यांचे न्यायालयात**
**ता.सावंतवाडी, जि.सिंधुदुर्ग**

(पिठासीन अधिकारी – जे. एम. मिस्त्री )
(अधिघोषित दिनांक ०९/०६/२०२६)

**नियमित फौजदारी खटला क्र. ३८/२०२२**
**निशाणी क्र. १८**

प्रथम खबर अहवाल क्रमांक–७१/२०२३
सावंतवाडी पोलीस ठाणे

| | |
|---|---|
| अभियोग पक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस निरीक्षक,<br>सावंतवाडी पोलीस स्टेशन |
| अभियोग पक्षातर्फे विधिज्ञ | श्री. जी. एन्. पाटोळे |
| | **विरुध्द** |
| आरोपी | लक्ष्मण धाकु शेळके,<br>वय–६५ वर्षे, धंदा–शेळीपालन.<br>रा. अनसुनपाल, कानाळवाडी,<br>ता. वेंगुर्ला, जि. सिंधुदुर्ग. |
| आरोपीकरिता विधिज्ञ | श्री. व्ही. एस. चव्हाण. |

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | २६/०३/२०२२ |
| गुन्हा दाखल दिनांक | २७/०३/२०२२ |
| दोषारोपपत्र दाखल दिनांक | ०९/०५/२०२२ |
| दोषारोप तयार केल्याचा दिनांक | ०६/११/२०२४ |
| पुरावा सुरु केल्याचा दिनांक | २४/०२/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | ०९/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | ०९/०६/२०२६ |
| दोषी ठरल्याचा दिनांक, जर असल्यास | निरंक |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीनावर मुक्त केल्याचा दिनांक | दोषारोप कलम | निर्दोष अथवा दोषी | आरोपीस सुनाविण्यात आलेली शिक्षा | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ करिता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | लक्ष्मण धाकु शेळके चव्हाण | निरंक | २३/०९/२०२२ | भारतीय दंड संहिता कलम ३७९ | निर्दोष मुक्तता करण्यात आली. | – | – |

## न्यायनिर्णय

## (घोषणा तारीख– ०९/०६/२०२६)

१. प्रस्तुतचा खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ या अपराधासाठी चालविण्यात आला.

२. अभियोग पक्षाच्या प्रकरणाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे –

फिर्यादी मुकुंद बाबुराव आंगचेकर हे आपल्या कुटुंबासह मौजे तळवडे, परबवाडी येथे रहातात. त्यांची गांवात वडिलोपार्जित शेती आहे. सन २०१९ मध्ये तळवडे जोशीवाडी येथे त्यांच्या शेतजमीनीजवळ त्यांनी खुला शेळी पालन व्यवसाय सुरु केला होता. त्यांच्याजवळ एकूण ३ बकरे, १२ शेळया, ८ लहान पिल्ले होती. दिनांक २६/३/२०२२ रोजी रात्री २०.०० वाजता ते त्यांच्या सर्व शेळयांना पाहून त्यांच्या घरी आले. दिनांक २७/३/२०२२ रोजी सकाळी ७.०० वाजण्याच्या सुमारास ते त्यांचे तळवडे जोशीवाडी येथील शेळी पालन व्यवसायाचे ठिकाणी गेले असता त्यांना त्यांच्या मालकीचे तीन बकरे व व नऊ शेळया दिसून आल्या नाहीत. त्यांनी आजुबाजुला शोधाशोध केली असता त्यांना त्यांचे बकरे व शेळया मिळून आल्या नाहीत. त्यामुळे सदर शेळया व बकरे यांची कोणीतरी अज्ञात इसमाने चोरी केल्याची त्यांची खात्री झाली. त्यामुळे त्यांनी अज्ञात इसमाविरुध्द पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

३. सदरची प्रथम खबर गुन्हा रजिस्टर नंबर ४२/०२२ ने नोंदवली व त्यानंतर प्रस्तुत गुन्ह्याचा तपास सहा. पोलिस फौजदार श्री. एस. एन. लोहकरे यांनी केला. त्यांनी घटनास्थळ पंचनामा केला. साक्षीदारांची टिपणे नोंदवली. त्यानंतर आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. प्रस्तुतकामी मी आरोपीविरुध्द नि. १३ प्रमाणे दोषारोप नोंद करुन तो त्याला वाचून व समजावून सांगितला. आरोपीने त्याचेवरील आरोप नाकारले व सुनावणीला सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

५. अभियोगपक्ष यांचा पुरावा बंद केलेनंतर आरोपीच्या विरोधात पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विधिज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

७. साक्षीदारांचे जाब जबाब आणि प्रकरणाचा अभिलेख पहाता, सदर प्रकरणात खालील मुद्दे निघतात. सदर मुद्दे व त्यांचे निष्कर्ष कारणांसहित खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| ०१. | दिनांक २६/०३/२०२२ रोजी २०.०० ते दिनांक २७/३/२०२२ रोजी सकाळी ७.०० वाजण्याच्या सुमारास मौजे तळवडे, जोशीवाडी येथे आरोपीने फिर्यादीच्या मालकीच्या ९ शेळया व ३ बकरे यांची फिर्यादीच्या संमत्तीशिवाय लबाडीच्या इराद्याने चोरी केली व त्याद्वारे त्याने भारतीय दंड विधान कलम ३७९ अन्वये गुन्हा केला असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| ०२. | काय आदेश ? | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## –:: कारणमिमांसा ::–

८. आरोपीविरुध्द तोहमत करणेत आलेला गुन्हा शाबीत करणेसाठी अभियोग पक्षातर्फे पुढीलप्रमाणे साक्षीदार तपासणेत आलेले आहेत.

**अ) अभियोगपक्षाचे साक्षीदार :–**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | मुकुंद बाबुराव आंगचेकर | फिर्यादी |

**ब) बचाव पक्षाचे साक्षीदार असल्यास :–**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क) न्यायालयीन साक्षीदार, असल्यास :–**

| अनु.क्र. | साक्षीदाराचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**अभियोगपक्ष, बचाव पक्ष व न्यायालयीन निशाणीची यादी**

**अ) अभियोग पक्ष :–**

| अनु.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.१६– सा. क्र. १ | फिर्यादवरील साक्षीदाराची सही. |

**ब) बचाव पक्ष :–**

| अनु.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क ) न्यायालयीन निशाणी :–**

| अनु.क्र. | निशाणी नंबर | निशाणी नंबरचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**ड) मुद्देमाल तपशील :–**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**<u>मुद्दे क्रमांक १ करीताः–</u>**

९. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षाचे हकीकतीस पुष्टी देण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादी मुकुंद आंगचेकर (सा. क्र. १) याची साक्ष नोंदविली आहे. सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यामध्ये असे कथन केले आहे की, त्याने शेळी पालनाचा व्यवसाय सुरु केला असून त्याने शेतीमध्ये पत्र्याची शेड व तारेचे कुंपण तयार केले होते. त्यामध्ये ९ शेळया, ३ बकरे व ८ पिल्ले होती. त्यांच्या शेळया कधी चोरीला गेल्या हे त्याच्या लक्षात नाही. त्याच्या शेळया कोणी चोरल्या हे त्याला माहिती नाही. त्याने अज्ञात इसमाविरुध्द तक्रार दिली होती. फिर्यादीने फिर्यादवरील त्याच्या सहि व्यतिरिक्त इतर मजकुराबाबत अनभिज्ञता दर्शविली आहे. सबब सरकारी वकीलांनी फिर्यादीस उत्तरसुचक प्रश्न विचारले. अभियोग पक्षाच्या सुचक प्रश्नांच्या उत्तरा दाखल फिर्यादीने अभियोग पक्षास सहकार्य होईल अशी कोणतीही बाब अभिलेखावर आलेली नाही. आरोपीतर्फे घेतलेल्या उलटतपासात फिर्यादीने गैरसमजुतीतुन तक्रार दिल्याचे कबुल केले आहे.

१०. प्रकरणात साक्षीदाराचा पुरावा बारकाईने पाहिला असता फिर्यादी व आरोपीची तडजोड झाल्याचे स्पष्ट होते. सदर तडजोड लक्षात घेता फिर्यादी आरोपीच्या विरोधात पुरावा देण्यास इच्छुक नाहीत असे दिसते. आरोपीतर्फे

घेतलेल्या उलटतपासात फिर्यादीने गैरसमजुतीतुन तक्रार दिल्याचे कबुल केले आहे.

११. फिर्यादी घटनेविषयी काहीही सांगत नाहीत. फिर्यादीने सरतपासात त्याच्या शेळया कधी चोरीला गेल्या हे त्याला आठवत नाही. त्या कोणी चोरल्या हे देखील त्याला माहित नाही असे कथन केले आहे. फिर्याद, घटनास्थळ व जप्ती पंचनामा सिध्द करण्यास अभियोग पक्ष असमर्थ ठरला आहे. त्यामुळे अभियोग पक्षाच्या हकीकत विषयी शंका निर्माण होते. आरोपीविरुध्द दोषारोप सिध्द करणारा सबळ पुरावा अभिलेखावर आला नाही. त्यामुळे आरोपीने फिर्यादीच्या मालकीच्या शेळयांची फिर्यादीच्या संमत्तीशिवाय चोरी केली हे सिध्द होत नाही. सबब मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष ''नकारार्थी'' नोंदविण्यात येत आहेत.

**मुद्दा क्र. २ करीताः–**

१२. प्रस्तुत प्रकरणात मुद्दा क्र १ साठी 'नकारार्थी' निष्कर्ष विचारात घेता, अभियोग पक्ष आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करु शकलेला नाही, असे म्हणता येईल. त्यामुळे आरोपीला निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होईल. सबब मी मुद्दा क्र. २ करीता पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

**:– आदेश –:**

१. आरोपीची भारतीय दंड विधान कलम ३७९ अन्वयेचे शिक्षेस पात्र अपराधातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचा जामिन कदबा व बंधपत्र रद्द करणेत येत आहे.

३. अ. क्र. १ व २ कडील जप्त मुद्देमाल ९ शेळया व ३ बकरे हे फिर्यादीच्या ताब्यात देण्यात आलेले आहेत. सदरचा ताबा अपील कालावधीनंतर कायम करण्यात येत आहे.

४. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये रक्कम रुपये १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचा जामीन द्यावा. सहा महिन्याच्या कालावधीत अपील न झाल्यास, सदरचे बंधपत्र रद्द झाले असे समजण्यात येईल.

(निकाल खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला. )

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.06.09 15:32:08 +0530

सावंतवाडी. (जे. एम. मिस्त्री ),

दिनांक –०९/०६/२०२६ प्रथमवर्ग, न्यायदंडाधिकारी,सावंतवाडी.